# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
# MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
Tel:(0253) 2539190/6659190/270
☎ Student Helpline:0253-2539111/6659111/100
Website: www.muhs.ac.in, E-mail: academic@muhs.ac.in

**डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ**
एम.बी.बी.एस, एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),डी.एन.बी, एल.एल.बी.
**कुलसचिव**

**Dr. Rajendra Shivaji Bangal**
M.B.B.S, M.D.( Forensic Medicine), D.N.B, L.L.B.
**Registrar**


मआविवि/ईओ/पदवी व पदव्युत्तर/११३१/२०२४ दि.१३/०८/२०२४

## परिपत्रक क्र.४५/२०२४

विषय :- पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता संलग्निकरणाचे नुतनीकरण / विस्तारीकरणाच्या प्रस्ताव व शुल्काबाबत....

संदर्भ :- सुधारीत शुल्क संरचना अध्यादेश क्र.०१/२०१७, दि.१७/०५/२०१७,

उपरोक्त विषय व संदर्भाच्या अनुषंगाने सर्व संलग्नित महाविद्यालयांना कळविण्यात येते की, मआविवि अधिनियम १९९८ कलम ६८ व ६९ नुसार संलग्निकरणाचे नुतनीकरण / विस्तारीकरणसाठी महाविद्यालयाने ज्या वर्षाचे संलग्निकरणाचे नुतनीकरण / विस्तारीकरण करावयाचे आहे. त्या वर्षाच्या आधीच्या वर्षातील दि.३१ ऑक्टोंबर पुर्वी संबंधित महाविद्यालयाने विहीत अर्ज व शुल्क विद्यापीठास सादर करणे बंधनकारक आहे. तसेच सोबत संलग्निकरणाचे नुतनीकरण / विस्तारीकरणासाठीचा विहित नमुना अर्ज व सुधारीत Fee Schedule देखील विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

१) महाविद्यालयाने विद्यापीठाने विहित केलेला अर्ज संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन संबंधित आवश्यक सर्व कागदपत्रांसह दि.३१ ऑक्टोंबर २०२४ पर्यंत विद्यापीठात गती पोस्ट (**Speed Post**) टपालाद्वारे सादर करावेत. तसेच, सदर प्रस्तावांचे विहित शुल्क आर.टी.जी.एस. / एन.ई.एफ.टी./ **Payment Gateway** द्वारे विद्यापीठास सादर करुन त्याची पोच पावती प्रस्तावांसोबत जोडण्यात यावी.

२) ज्या महाविद्यालयांना पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी ई.डब्ल्यु.एस. (**EWS**) कोटा मंजुर करण्यात आलेला आहे, त्या महाविद्यालयांनी संलग्निकरणाचे नुतनीकरण व विस्तारीकरणाचे शुल्क देखिल लागु राहील व सदर शुल्क आर.टी.जी.एस. / एन.ई.एफ.टी. / **Payment Gateway** द्वारे विद्यापीठास सादर करावी.

३) तसेच विद्यापीठाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, महाविद्यालयांकडुन यापुर्वी सादर करण्यात आलेले प्रस्ताव व्यवस्थितरीत्या बॉक्स फाईलमध्ये नसतात. त्याअनुषंगाने, महाविद्यालयांना सूचित करण्यात येते की, सदर प्रस्ताव विद्यापीठास सादर करतांना व्यवस्थितरीत्या मिनीबॉक्स फाईलमध्ये नस्तीकरण करुन सादर करण्यात यावेत. जेणेकरुन प्रस्ताव विद्यापीठास योग्यरीत्या प्राप्त होईल. अशाप्रकारे प्रस्ताव सादर न केल्यास सदर प्रस्ताव विद्यापीठातर्फे स्विकारण्यात येणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

(कृ.मा.प.)

४) संलग्निकरणाचे नुतनीकरण / विस्तारीकरणाचा विहित नमुन्यातील अर्ज विद्यापीठास विहित मुदतीमध्ये महाविद्यालयाने सादर करावे, जेणेकरुन संलग्निकरणासंबंधीची पुढील कार्यवाही करणे शक्य होईल. तसेच, दि.३१ ऑक्टोंबर २०२४ नंतर प्राप्त प्रस्तावांबाबत विद्यापीठाने ठरविलेले विलंब शुल्क लागु होईल व महाविद्यालयाने विद्यापीठास विलंब शुल्क देणे बंधनकारक राहील.

सर्व महाविद्यालयांनी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संलग्निकरण / विस्तारीकरणाच्या संदर्भातील विहित नमुन्यातील अर्ज विहित शुल्कासह (आर.टी.जी.एस. / एन.ई.एफ.टी. / Payment Gateway) विद्यापीठास वेळेत सादर करावेत, जेणेकरुन आपल्या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या संलग्नीकरण / विस्तारीकरणाबाबत पुढील कार्यवाही करणे सुकर होईल.

स्वा/-

कुलसचिव

प्रति,
अधिष्ठाता / प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये /शैक्षणिक संस्था /परिसंस्था
पदवी व पदव्युत्तर पदवी,
मआविवि, नाशिक.

सोबत -

१) संलग्निकरणाचे नुतनीकरण / विस्तारीकरणाचा विहित नमुन्यातील अर्ज
२) प्रमाणपत्र अभ्यासक्रमाकरीता संलग्निकरणाचे नुतनीकरण / विस्तारीकरणाचा विहित नमुन्यातील अर्ज
३) आधुनिक मध्यमस्तरीय सेवा प्रदाता अभ्यासक्रमाकरीता संलग्निकरणाचे नुतनीकरण / विस्तारीकरणाचा विहित नमुन्यातील अर्ज